Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

# वृत्तपत्रीय निवेदन

## श्री ए बी विजयकुमार यांची बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती



पुणे दिनांक १० मार्च २०२१.   : श्री ए बी विजयकुमार यांची आज दिनांक १० मार्च २०२१ रोजी बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नियुक्ती होण्यापूर्वी श्री विजयकुमार हे इंडियन ओव्हरसीज बँक येथे दिनांक १ एप्रिल २०२० पासून मुख्य सतर्कता अधिकारी म्हणून कार्यरत होते. इंडियन ओव्हरसीज बँकेत रुजू होण्यापूर्वी त्यांनी पूर्वीच्या कॉर्पोरेशन बँकेत मुख्य सतर्कता अधिकारी म्हणून व त्यापूर्वी मध्य प्रदेश ग्रामीण बँकेचे अध्यक्षपदी कार्यरत होते.

श्री विजयकुमार यांनी त्यांची बँकिंग मधील कारकीर्द सन १९८४ मध्ये बँक ऑफ इंडिया मधून सुरु केली व बँकिंग क्षेत्रात काम करण्याचा त्यांच्याकडे ३४ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. प्रत्यक्ष क्षेत्र स्तरावर व प्रशासकीय कार्यालयात बँकेच्या कर्मचारी प्रशिक्षण महाविद्यालयासह महत्वाचे विभाग हाताळत ते सन २०१८ मध्ये सरव्यवस्थापक झाले. त्यांनी देशात अनेक ठिकाणी काम केले असून हाँगकाँग केंद्राचे अनुपालन अधिकारी म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

श्री विजयकुमार यांचेकडे सुमारे ३ दशका पेक्षा अधिक काळ बँकिंगच्या विविध क्षेत्रात काम करण्याचा अनुभव असून या सर्व कालावधीत त्यांनी मोठ्या निगमिय कंपन्या विभाग, रिटेल बँकिंग विभाग, प्राथमिकता क्षेत्र, विदेशी चलन विनिमय विभाग, अनुपालन, संचालक मंडळ सचिवालय, मानव संसाधन व सतर्कता यंत्रणेत काम केले आहे.

श्री विजयकुमार यांनी वाणिज्य व विधी क्षेत्रात पदवी प्राप्त केली असून भारतीय बँकिंग संस्थेचे ते प्रमाणित फेलो आहेत. त्यांनी भारतीय बँकिंग वित्त संस्थेच्या व्यापार वित्तसहाय्य, विदेशी चलन विनिमय, केवायसी , रिटेल बँकिंग व्यवसाय, ग्राहक सेवा यासंबंधीचे विविध पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुद्धा पूर्ण केले आहेत.